20 DEC 2022

पुण्यनगरी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोकशाही समाजवादाचे राजर्षी शाहू प्रेरणास्थान

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के : 'लोकशाही समाजवादाची प्रेरक शक्ती : राजर्षी शाहू' या ग्रंथाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाराजांनी सर्व क्षेत्रांमध्ये उत्तुंग कार्य केले आहे. त्यांच्या प्रत्येक कार्याची संकल्पना घेऊन तज्ज्ञ आणि संशोधकांनी सविस्तर अभ्यास करावा. राजर्षी शाहू यांच्या लोकशाही समाजवाद या पैलूवर स्वतंत्र अभ्यास करण्याची गरज आहे; कारण राजर्षी शाहू हे लोकशाही समाजवादाचे प्रेरणास्थान होते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के यांनी येथे केले.



कोल्हापूर : ग्रंथाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी डॉ. सुनीलकुमार लवटे, दीपक जगदाळे, डॉ. अरुण शिंदे, डॉ. अशोक चौसाळकर, रमेश चव्हाण, डॉ. प्रकाश पवार आदी मान्यवर. (छाया : अर्जुन टाकळकर)

रा. ना. चव्हाण प्रतिष्ठान, सार्थक सांस्कृतिक केंद्र व क्रिएटिव्ह टीचर्स फोरम यांच्या वतीने रमेश चव्हाण संपादित 'लोकशाही समाजवादाची प्रेरक शक्ती : राजर्षी शाहू' या ग्रंथाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के बोलत होते. सार्थक सांस्कृतिक केंद्र सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठातील सर्व अध्यासनांची बैठक घेऊन रा. ना. चव्हाण यांच्या राजर्षी शाहू महाराजांवरील पुस्तकाच्या अनुषंगाने चर्चा घडवून आणली जाईल. विशेष संकल्पना म्हणून एक वर्ष याच विषयावर अध्यासनांनी सखोल अभ्यास करावा, यासाठी नियोजन केले जाईल.

डॉ. चौसाळकर म्हणाले, महाराष्ट्राचे प्रबोधन विश्व चव्हाण यांनी या ग्रंथातून उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.


राजकीय विश्लेषक डॉ. प्रकाश पवार म्हणाले, या ग्रंथाची भाषा सोपी आणि सर्वसामान्यांना कळेल अशी आहे. प्रा. डॉ. अरुण शिंदे यांनी या ग्रंथातील विचार सोप्या भाषेत उपस्थितांसमोर उलगडून दाखवले.

### स्वखर्चाने ४३ पुस्तकांचे प्रकाशन

रा. ना. चव्हाण यांच्या ४३ पुस्तकांचे प्रकाशन त्यांचे सुपुत्र रमेश चव्हाण यांनी स्वखर्चाने केले आहे. आज एकीकडे मुले वडिलांच्या संपत्तीसाठी वाद करत असताना चव्हाण हे आपल्या वडिलांचा प्रबोधनाचा वारसा समर्थपणे सांभाळत असल्याचे कौतुकोद्गार यावेळी मान्यवरांकडून काढण्यात आले.

यावेळी दीपक जगदाळे, वैशाली चव्हाण, शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, प्राचार्य डॉ. जे. के. पवार, डॉ. दिनकर पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : 'स्किल' पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. शेजारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. पी. डी. राऊत, डॉ. सरिता ठकार, डॉ. केदार मारुलकर आदी.

# कौशल्य विकासासाठी 'स्किल' पुस्तक उपयुक्त : डॉ. शिर्के

कोल्हापूर, ता. १९ : "कौशल्यनिर्मिती आणि विकास या क्षेत्रांमध्ये डॉ. अण्णासाहेब गुरव प्रभावी कामगिरी बजावत आहेत. त्यांच्या अनुभवातून निर्माण झालेले 'स्किल' पुस्तक निश्चितपणे सर्वच घटकांसाठी उपयुक्त व मार्गदर्शक ठरेल," असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. त्यांच्या हस्ते 'स्किल' पुस्तकाचे प्रकाशन झाले.

डॉ. गुरव आणि प्राचार्य डॉ. आर. एस. साळुंखे यांनी लेखन केले आहे. प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांची प्रमुख उपस्थित होते.

डॉ. शिर्के म्हणाले, "डॉ. गुरव यांनी कौशल्याच्या अनुषंगाने इंग्रजीतून निर्माण केलेले पुस्तक महत्त्वाचे आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत त्याचे लाभ पोहोचविण्यासाठी त्यांनी त्याचा मराठीतून अनुवाद करावा."

कौशल्य व उद्योजकता केंद्राच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन झाले. प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, शिवाजी युनिव्हर्सिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. पी. डी. राऊत, डॉ. केदार मारुलकर उपस्थित होते. डॉ. गुरव यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी आभार मानले.

सकाळ



कोल्हापूर : सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार सुरू करण्यासाठी सात लाख रुपयांच्या निधीचा धनादेश शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द करताना डॉ. गौरी कहाते.

# आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कारासाठी सात लाख निधी

कोल्हापूर, ता. १९ : संतसाहित्य व अध्यात्माचे गाढे अभ्यासक सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुरस्कार प्रदान करण्यासाठी सात लाख रुपयांचा निधी देऊन त्यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठावर मोठा विश्वास दाखविला आहे. त्या अनुषंगाने लवकरच कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी येथे दिली.

डॉ. मुंगळे यांच्या कन्या डॉ. गौरी कहाते यांनी त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शिवाजी विद्यापीठात 'स्व. सद्गुरू गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार देण्यासाठी सात लाख रुपयांच्या देणगीचा धनादेश कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. त्या वेळी ते बोलत होते.

डॉ. कहाते म्हणाल्या, "माझे वडील डॉ. मुंगळे इंग्रजी, संस्कृत विषयांतील तज्ज्ञ होते. १९९९ पर्यंत त्यांनी अध्यापन केले. सोबतच संतसाहित्य, अध्यात्म यांचा अभ्यास व लेखन केले. त्यातून त्यांनी लिहिलेली १५ पुस्तके प्रकाशित आहेत. त्यांनी त्यांच्या आध्यात्मिक प्रवासाबद्दल व्यक्त केलेले मनोगत २५ डिसेंबरला कोल्हापूर येथे प्रकाशित करण्यात येत आहे. डॉ. डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाने (मुंबई) त्यांना डी. लिट. मानद पदवी दिली. त्यांना कोल्हापूर भूषण, पुणे भूषण, ऋग्वेद भूषण आदी पुरस्कारांनीही सन्मानित केले आहे. ६ ऑगस्ट २०२० ला त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सदर पुरस्कार द्यावा." प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. अजय देशपांडे उपस्थित होते.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाच्या स्तुती कार्यक्रमाला प्रतिसाद

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठासह शिवाजी विद्यापीठात झालेल्या स्तुती कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या सात दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमात झालेल्या अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण प्रशिक्षण कार्यशाळेतील व्याख्यानमालेत गेल्या सात दिवसांत एकूण १४ तज्ज्ञांची व्याख्याने झाली.

बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठात दि. ११ ते १७ डिसेंबरदरम्यान हा स्तुती कार्यक्रम पार पडला. यामध्ये स्तुती पीएमयूचे समन्वयक, शिवाजी विद्यापीठाचे प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी एक्स-रे डीफरॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप आणि ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणांवर मार्गदर्शन केले.

20 DEC 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठास गार्डन क्लब पुष्प स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद

## विद्यापीठाच्या गुलाबास 'क्वीन ऑफ दि शो'चा बहुमान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गार्डन क्लब व कोल्हापूर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुष्प प्रदर्शन स्पर्धेत शिवाजी विद्यापीठास सलग तिसऱ्या वर्षी सर्वसाधारण विजेतेपद मिळाले. विद्यापीठाच्या गुलाबास 'क्वीन ऑफ दि शो'चा बहुमान मिळाला.

विद्यापीठाने विविध पुष्प स्पर्धांत १७ प्रथम, १४ द्वितीय व १८ तृतीय क्रमांक अशा ४९ पारितोषिकांसह सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. विद्यापीठाच्या दुरंगी गुलाबास 'क्वीन ऑफ दि शो'चा बहुमान मिळाला. जीएसटी विभागाच्या सहआयुक्त सुनीता थोरात यांच्या हस्ते विद्यापीठाच्या उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव, स्वच्छता निरीक्षक शशिकांत साळुंखे यांना सर्वसाधारण विजेतेपदाची ट्रॉफी प्रदान करण्यात आली.

यावेळी आर. एल. तावडे फौंडेशनच्या शोभा तावडे, कल्पना सावंत, शशिकांत कदम, पल्लवी कुलकर्णी, राज अथणे उपस्थित होते.




कोल्हापूर : गार्डन क्लबच्या पुष्प स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक सुनीता थोरात यांच्या हस्ते स्वीकारताना शिवाजी विद्यापीठाच्या उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव आदी.

पुढारी

# अस्लम सईद यांचे उद्या विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो.



जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे चेन्नई फोटो बिनालेचे विभागीय समन्वयक, पर्यावरण फोटोग्राफर अस्लम सईद (मुंबई) यांचे पर्यावरण फोटोग्राफी विषयावर व्याख्यान बुधवारी (दि. २१) सकाळी १०.३० या वेळेत आयोजित केल्याची माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली. चेन्नई फोटो बिनाले फोटोग्राफर यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना आहे. संघटनेकडून छोट्या शहरातील फोटोग्राफरसाठी स्पर्धा आयोजित केली जाते. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या फोटोग्राफरला ५० हजार रुपयांचे पारितोषिक दिले जाते. या स्पर्धेची माहिती सईद देणार आहेत. कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन जाधव यांनी केले आहे.

पुढारी

# आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भुवनेश्वर-ओडिशा येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला आहे.

भुवनेश्वर येथे २६ ते २९ डिसेंबरअखेर स्पर्धा होणार आहेत. संघामध्ये सहा मुली व सहा मुले यांचा समावेश आहे. संघाचे मार्गदर्शक म्हणून सुरेश धुरे यांची, तर संघ व्यवस्थापक म्हणून डॉ. प्रिया टेळे यांची नियुक्ती केली आहे. खेळाडूंना शिवाजी विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या.

20 DEC 2022
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय भाषा प्रशिक्षणात शिवाजी विद्यापीठाचा सहभाग

कोल्हापूर, ता. १९ : हनोई (व्हिएतनाम) येथे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय प्रगत प्रशिक्षण परिषदेमध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रशियन भाषा शिक्षकांनी सहभाग घेतला आणि विविध देशांतील भाषातज्ज्ञांशी शैक्षणिक व सांस्कृतिक सद्यस्थितीबाबत वैचारिक आदानप्रदान केले. 'द रशियन फेडरल एजन्सी फॉर ह्युमॅनिटेरियन को-ऑपरेशन' या रशियन संस्थेच्या पुढाकाराने आशियाई देशांमधील विविध विद्यापीठांत रशियन भाषा अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी एका प्रगत प्रशिक्षण अभ्यासक्रमाचे आयोजन केले होते.

'भाषिक वातावरणाच्या अभावात परदेशी भाषा म्हणून रशियन भाषा अध्यापन पद्धती' विकसित करण्याच्या दृष्टीने ४ ते ७ डिसेंबर या कालावधीत हनोई (व्हिएतनाम) येथील 'रशियन हाऊस'मध्ये हा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षण झाले. यात सहभाग घेण्यासाठी हनोई येथील 'सेंटर फॉर द सपोर्ट ऑफ सोशल, कल्चरल अँड एज्युकेशनल प्रोजेक्ट्स'तर्फे विद्यापीठातील विदेशी भाषा केंद्राच्या रशियन भाषा अध्यापकांना अधिकृतरित्या आमंत्रित केले होते. विभागाच्या सहयोगी प्राध्यापक डॉ. मेघा पानसरे, सहयोगी अध्यापक शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर व अभिषेक जोशी यांनी सहभाग घेतला.

20 DEC 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त झालेल्या यसबा करंडक कला महोत्सवात सहभागी व पारितोषिकप्राप्त विद्यार्थी.

# यसबा करंडक चाटे शिक्षण समूहाकडे

कोल्हापूर, ता. १९ : ज्येष्ठ दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या चौथ्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठ विद्यार्थी विकास विभाग व यशवंत भालकर फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने यसबा करंडक आंतरशालेय कला महोत्सव नुकताच रंगला. त्यामध्ये चाटे शिक्षण समूहाने यसबा करंडकावर नाव कोरले. विद्यापीठ विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, प्रा. नंदकुमार रानभरे, जनसंपर्क अधिकारी अलोक जत्राटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत महोत्सवाला प्रारंभ झाला.

चित्रकला, निबंध, एकपात्री, समूह नृत्य, समूह गायन या पाच कला प्रकारामध्ये १५ शाळेचे सुमारे २९० विद्यार्थी सहभागी झाले. संजय तोडकर, किरण पोटे, गौरी चिले, महेश पाटील, भाग्यश्री कालेकर, महेश हिरेमठ, वेदा सोनूले, व्यंकटेश बिदनूर, मनीपद्म हर्षवर्धन यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव विलास शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी, अभिनेते नितिन कुलकर्णी, रेखा भालकर, सुनील घोरपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. फाउंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, उपाध्यक्ष सपना भालकर, नृत्य दिग्दर्शक संग्राम भालकर यांनी संयोजन केले. अर्चना शिंदे यांनी सूत्रसंचालन केले.

## विविध स्पर्धांचा अनुक्रमे निकाल

- **चित्रकला :** विमला गोयंका इंग्लिश स्कूल, छत्रपती शाहू विद्यालय, चाटे स्कूल, प्रायव्हेट हायस्कूल.
- **निबंध :** वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूल, विमला गोयंका इंग्लिश स्कूल, चाटे स्कूल, एकलव्य इंग्लिश स्कूल, छत्रपती शाहू विद्यालय
- **एकपात्री :** न्यू मॉडेल इंग्लिश स्कूल, संजीवन पब्लिक स्कूल, चाटे स्कूल, वि. स. खांडेकर प्रशाला, नेहरू विद्यामंदिर (कोतोली), वसंतराव देशमुख हायस्कूल
- **समूह गीत :** श्री बालाजी हायस्कूल (इचलकरंजी), वसंतराव चौगुले इंग्लिश स्कूल, संजीवन पब्लिक स्कूल, वि. स. खांडेकर प्रशाला, प्रायव्हेट हायस्कूल.
- **समूह नृत्य :** श्री बालाजी हायस्कूल, चाटे स्कूल, वसंतराव देशमुख हायस्कूल.

सकाळ



**नानीबाई चिखली : सुवर्णपदक विजेत्या खेळाडूसमवेत प्रा. रवींद्र चव्हाण.**

# आंतरविभागीय कुस्तीत 'देवचंद'चे यश

**नानीबाई चिखली :** शिवाजी विद्यापीठअंतर्गत आंतरविभागीय फ्री स्टाईल व ग्रोको रोमन कुस्ती स्पर्धा वेणूताई चव्हाण कॉलेज, कऱ्हाड येथे झाल्या. स्पर्धेत अर्जुननगर (ता. कागल) येथील देवचंद महाविद्यालयांच्या खेळाडूंनी ४ सुवर्णपदके व २ रौप्यपदके पटकावली. विजयी खेळाडू असे, स्वाती शिंदे, अंकिता शिंदे, सातापा हिरुगडे, संतोष हिरुगडे यांनी सुवर्णपदके तर अंजली पाटील, ओंकार लंबे यांनी रौप्यपदक पटकावले. विजयी खेळाडूंना जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष आशीष शाह, उपाध्यक्षा डॉ. तृप्ती शाह, सुबोध शाह यांचे प्रोत्साहन लाभले. प्राचार्य डॉ. प्रशांत शाह, उपप्राचार्या डॉ. जी. डी. इंगळे, जिमखाना विभागप्रमुख प्रा. रवींद्र चव्हाण, क्रीडाशिक्षक प्रा. निरंजन जाधव, प्रशिक्षक दादासो लवटे, अनंत घोळवे संतोष वागळे, वैभव सोनार यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ

# योगासन स्पर्धेसाठी विद्यापीठाचा संघ जाहीर

कोल्हापूर, ता. १९ : भुवनेश्वर ओडिशा येथील अखिल भारतीय आंतरविद्यापीठ योगासन स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचा संघ जाहीर झाला. स्पर्धा २६ ते २९ डिसेंबर या कालावधीत आहे.

संघात सहा मुली व सहा मुलांचा समावेश आहे. त्यांना क्रीडासंचालक डॉ. शरद बनसोडे यांनी शुभेच्छा दिल्या. मुलांच्या संघात मनन कास्लीवाल, ऋषीराज माने, समीर सनगर, अभिजित सावंत, ओम वरदाई, घननिल लोंढे यांची निवड झाली. मुलींच्या संघात सानिका जाधव, प्रज्ञा गायकवाड, क्षितिजा पाटील, अक्षता भाईगडे, वैष्णवी हजीरे, साक्षी म्हेत्रे यांचा समावेश होता. मार्गदर्शक म्हणून सुरेश धुरे यांची नियुक्ती केली. व्यवस्थापक म्हणून डॉ. प्रिया टेळे यांची नियुक्ती केली. यावेळी डॉ. राम पवार पृथ्वीराज सरनाईक आणि खेळाडू, क्रीडा प्रशासकीय कर्मचारी उपस्थित होते.

20 DEC 2022

सकाळ


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूरच्या कलापरंपरेचे बिनीचे शिलेदार

**कोल्हापूरच्या कलापरंपरेसाठी अविरत झटणारे बिनीचे शिलेदार चंद्रकांत जोशी यांचा मंगळवार दिनांक २० डिसेंबर २०२२ रोजी पहिला स्मृतिदिन, त्यानिमित्त...**

– **उदय कुलकर्णी**, कोल्हापूर

१९८० च्या दशकात सागर सरहदी यांच्या 'तेरे शहर में' या चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी म्हणून स्मिता पाटील, नसिरुद्दीन शाह, कुलभूषण खरबंदा कोल्हापुरात आले असताना स्मिता पाटील यांनी जोशींना विचारलं, 'मास्तर, तुम्हाला सर्व कलांमधील जाणकारी आहे, सिनेमाचे बारकावेही तुम्ही जाणता मग तुम्ही स्वत:च चित्रपटनिर्मिती का करत नाही? तुम्ही चित्रपट निर्मिती करणार असाल तर मी त्यात काम करायला तयार आहे!' स्मिताच्या या उद्गारांनी जोशी चित्रपट दिग्दर्शन, निर्मितीकडं वळले. गिरीश कार्नाड, स्मिता पाटील, नाना पाटेकर यांच्या प्रमुख भूमिका असणारा 'सूत्रधार' हा चंद्रकांत जोशी दिग्दर्शित पहिला चित्रपट समीक्षकांनीही वाखाणला. स्मितानं प्रेरणा दिली आणि जोशी चित्रपट दिग्दर्शक बनले. महत्त्वाची बाब म्हणजे कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी जगभरातील उत्तम चित्रपटांशी कोल्हापूरकरांचं नातं प्रस्थापित करण्यासाठी अनेक वर्षं परिश्रम घेतले. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांच्या नकाशावर आम्हा सहकाऱ्यांइतकाच त्यांचा वाटा महत्त्वाचा होता. कोरोनानंतर फिल्म सोसायटीला उभारी देण्याची आमची धडपड होती. त्यावेळी अचानक 'सुमित्रा भावे चित्रपट महोत्सवा'च्या मध्यात जोशींनी एक्झिट घेतली.



**चंद्रकांत जोशी**

१९८३ ला अखिल भारतीय मराठी नाट्यपरिषदेची कोल्हापूर शाखा पुनरुज्जीवित करण्याबरोबरच नाट्य संमेलन भरवण्याचं स्वप्न जोशींनी पाहिलं. त्यासाठी दिवसरात्र एक केला. कोल्हापूरची कलापरंपरा सर्वांगानं फुलली पाहिजे आणि कलेच्या संदर्भातील 'कोल्हापूर स्कूल'चं महत्त्व आंतरराष्ट्रीय स्तरावर नोंदलं पाहिजे, यासाठीच जणू जोशींनी आयुष्य समर्पित केलं. जोशींच्या या वृत्तीचा परिचय कलाविश्वाला असल्यामुळे १९८३ मध्ये ६३ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन कोल्हापुरात भरविण्याचा विडा समविचारींच्या साथीनं त्यांनी उचलल्यानंतर मराठी नाट्यसृष्टीतील ४८ नामवंत कलावंतांनी मानधनाची अपेक्षा न करता संमेलनात सहभाग दिला. संमेलनाचं अध्यक्षपद रणजित देसाईंनी भूषविलं होतं.

पौरोहित्य, कलाशिक्षक, कला दिग्दर्शक व अभिनेता, चित्रपट निर्माता व दिग्दर्शक आणि आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी कलामहर्षी बाबूराव पेंटर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष या नात्याने समर्थपणे सांभाळणारे संयोजक ही सगळी बिरुदावली चंद्रकांत जोशी या एकाच माणसाची होती.

कलामहर्षी बाबूराव पेंटर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त मुंबईत भरविलेले प्रदर्शन असो किंवा त्या निमित्ताने केलेली इंग्रजी व मराठीतील स्मरणिका असो त्यासाठी त्यांनी अफाट मेहनत घेतली. कोल्हापुरात ग्रंथमहोत्सव असो, नाट्यमहोत्सव असो की चित्रपटमहोत्सव असो, चंद्रकांत जोशी त्याच्या आयोजनाचा भाग नाहीत असं कधी घडायचं नाही. ते जाऊन एक वर्ष झालं, पण आजही त्यांचं नसणं मनाला पटत नाही. कोल्हापूरच्या कलापरंपरांचं एकत्रित स्वरूपातील संग्रहालय असायला हवं असं जोशींचं स्वप्न होतं. लक्ष्मीकांत देशमुख जिल्हाधिकारी असताना या संदर्भातील सविस्तर प्रस्ताव तयार करून तो शासनाकडं पाठवण्यापर्यंत जोशींनी पाठपुरावा केला होता. दुर्दैवानं त्यांचं हे स्वप्न आकाराला येऊ शकलेलं नाही. शिवाजी विद्यापीठात ललित कलाविभाग सुरू व्हावा आणि तो सुरू राहावा यासाठी आर्थिक अपेक्षा न करता जोशींनी काही वर्षे या विभागात शिकवण्याचं काम केलं. चंद्रकांत जोशी यांना आदरांजली वाहायची तर कोल्हापूरच्या कलापरंपरांचं योग्य पद्धतीनं संग्रहालय उभारणं आणि विद्यापीठाच्या ललितकला विभागाला नवसंजीवनी देणं हे महत्त्वाचं ठरणार आहे.

20 DEC 2022 तरूण भारत
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# महाराजा सयाजीराव विद्यापीठात स्तुती कार्यक्रम

## सहभागींना दाखवली आधुनिक उपकरणांची प्रात्यक्षिके

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग प्रायोजित स्तुती कार्यक्रमांतर्गत अत्याधुनिक विश्लेषणात्मक उपकरण प्रशिक्षण कार्यशाळा बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठात झाली. अनेक महाराष्ट्रीय बडोदा येथे स्थायिक झाले असल्याने दोन्ही राज्याचे वेगळे नाते आहे. या कार्यशाळेत संशोधकांना अत्याधुनिक उपकरणांची प्रात्यक्षिके दाखवण्यात आली. तसेच देशातील नामवंत प्राध्यापक, वैज्ञानिकांचे मार्गदर्शन लाभले. सर्व सहभागींनी शिवाजी विद्यापीठ स्तुती कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. राजेंद्र सोनकवडे यांचे कौतुक केले.

स्तुती कार्यक्रम महाराष्ट्र, गुजरात, बिहार, दिल्ली, मध्य प्रदेश इत्यादी अनेक राज्यांमधून ३० पेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी झाले होते. महाराजा सयाजीराव विद्यापीठातून २० सहभागींनी या संधीचा लाभ घेतला. १४ तज्ज्ञांची व्याख्याने सहभागींना ऐकायला मिळाली. डॉ. सोनकवडे यांनी



**बडोदा : येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठातील स्तुती कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. विजय श्रीवास्तव, डॉ. राजेंद्र सोनकवडे, डॉ. टी. राजमन्नर आदी.**

एक्स-रे डीफरॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप आणि ट्रान्समिशन इलेक्ट्रॉन मायक्रोस्कोप या उपकरणांवर मार्गदर्शन केले. अत्याधुनिक उपकरणे केंद्र, आनंद येथे विविध अत्याधुनिक उपकरणांच्या भेटीसाठी शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते. औद्योगिक क्षेत्राला या अत्याधुनिक उपकरणाची उपयुक्तता आहे. संशोधक प्राध्यापक आणि उद्योजकांनी एकत्र येऊन मेक इन इंडियामध्ये सहभागी व्हावे. अत्याधुनिक साधने विकसित करण्याचा प्रयत्न करावा, असे आवाहन डॉ. सोनकवडे यांनी व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे म्हणून बडोदा येथील महाराजा सयाजीराव विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विजय श्रीवास्तव उपस्थित होते. त्यांनी जय जवान, जय किसान, जय विज्ञान, जय अनुसंधन आदी उद्दिष्ट्ये सांगितली. स्तुतिसारख्या कार्यक्रमातून अनेक गोष्टी साध्य करता येतील, असेही त्यांनी सांगितले. सन फार्मा ॲडव्हान्स रिसर्च कंपनी लि.चे संचालक डॉ. टी. राजमन्नर यांनी बहुविद्याशाखीय, अनुशासनात्मक दृष्टीकोन ठेवून संशोधन होण्याची गरज असल्याचे सांगितले.

20 DEC 2022 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प. वि. आंतरविद्यापीठ फुटबॉलमध्ये शिवाजी विद्यापीठचा पहिला विजय

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेअंतर्गत सुरु असलेल्या साखळी फेरीतील पहिल्याच सामन्यात शिवाजी विद्यापीठ संघाने भोपाळ (मध्यप्रदेश) येथील जागरण लेक विद्यापीठला ३-० गोलने पराभूत केले. जबलपूरमधील (मध्यप्रदेश) राणी दुर्गावती विद्यापीठाच्या मैदानात ही स्पर्धा सुरु आहे. या स्पर्धेअंतर्गत सर्व सामने ४०-४० मिनिटांमध्ये खेळवले जात आहेत.

शिवाजी विद्यापीठ संघाने स्पर्धेतील पहिला साखळी सामना जागरण लेक विद्यापीठविरुद्ध खेळला. सामन्याच्या पुर्वार्धात आक्रमक चाली करत जागरण विद्यापीठावर शिवाजी विद्यापीठाच्या संदेश कासारने पहिला तर केवळ कांबळेने दुसरा गोल केला. तसेच उत्तरार्धात ही संदेश कासारने तिसरा गोल नोंदवला.

अखेर याच तीन गोलच्या ओझ्याने जागरण विद्यापीठाला पराभव स्वीकारावा लागला. शिवाजी विद्यापीठ संघाचे प्रशिक्षक म्हणून प्रा. अभिजीत वणिरे व संघ व्यवस्थापक म्हणून केतन आडनाईक कार्यरत आहेत. मंगळवार २० रोजी शिवाजी विद्यापीठ संघाचा सामना मेहसाना विद्यापीठशी होणार आहे. या सामन्यात चांगली कामगिरी करण्याचे आव्हान विद्यापीठ संघासमोर असणार आहे.